**निशाणी ३०**

**<u>अभियोगपक्षातर्फे सा.क्र. १ याची जबानी</u>**
**<u>मी याद्वारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की,</u>**

| | |
|---|---|
| माझे नाव – निखील योगेश पोखरकर, | वय – २२ वर्षे, |
| व्यवसाय – नोकरी, | राहणार – मोग्रस, |
| तालुका – अकोले, | जिल्हा – अहमदनगर. |

**<u>सरतपास अभियोगपक्षातर्फे विशेष सहायक सरकारी अभियोक्ता श्रीमती. एस. ए. भोसले यांच्या मार्फत</u> –**

१. दिनांक १६.०५.२०२२ रोजी पोलीसांनी मला पंचनाम्यासाठी बोलावले नव्हते. पोलीसांनी माझे समक्ष काहीही कार्यवाही केली नव्हती. आता मला अभिलेखावरील घटनास्थळ जप्ती पंचनामा दाखवण्यात आला. त्यावर माझी सही असून त्यातील मजकुराबाबत मला माहीती नाही. सहीस **निशाणी ३१** देण्यात येते.

*(साक्षीदार अभियोगपक्षास सहकार्य करत नसल्यामुळे सहा. सरकारी अभियोक्ता यांनी साक्षीदारास भारतीय साक्षीपुरावा कायदा कलम १५४ प्रमाणे उत्तरसुचक प्रश्न विचारण्याची परवानगी मागितली. परवानगी देण्यात आली.)*

**<u>उलटतपास अभियोगपक्षातर्फे विशेष सहायक सरकारी अभियोक्ता श्रीमती. एस. ए. भोसले यांच्या मार्फत</u> –**

२. हे म्हणणे खरे नाही की, दिनांक १६.०५.२०२२ रोजी पोलीसांनी मला फिर्यादीचे मामा सतिष चौधरी यांचे घरासमोरील शेतामध्ये मला पंचनाम्यासाठी बोलावले होते. हे म्हणणे खरे नाही की, फिर्यादी किरण गुंजाळ याने घटनास्थळ दाखवले. हे म्हणणे खरे नाही की, त्या ठिकाणी पोलीसांनी माझ्या समक्ष २ फुट ३ इंच लांबीचा गज व २ किलो वजनाचा

**निशाणी ३०**

एक दगड जप्त केला. हे म्हणणे खरे नाही की, त्या ठिकाणी घटनास्थळावर दिसत्या परिस्थितीनुसार घटनास्थळ जप्ती पंचनामा तयार केला, तो मला वाचून दाखवला व त्यानंतर मी त्यावर सही केली. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीला वाचवण्यासाठी मी आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास आरोपींतर्फे विद्वान विधिज्ञ श्री. एस .डी. पोखरकर यांच्या मार्फत**

उलटतपास नाकारला.
फेरतपास काही नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत,

ANANT RADHAKISHAN TENGSE
Digitally signed by ANANT RADHAKISHAN TENGSE
Date: 2025.12.23 16:24:39 +0530

दिनांक २३.१२.२०२५
अकोले

**( अनंत रा. टेंगसे )**
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग
कोर्ट नं. २, अकोले .